# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (स्थापना विभाग)

जाहिरात क्र. 816 /ज.स./2019 दि. 15/ 02/2019

### <u>जाहीरात</u>

### <u>भरती प्रक्रियेबाबत उमेदवारांसाठी सर्वसाधारण सूचना</u>

नागपूर महानगरपालिकेच्या विविक्षित कामासाठी खालीलप्रमाणे तांत्रिक पदे निर्माण करण्यात आलेली असुन निव्वळ कंत्राटी **<u>तत्वावर 6 महिन्याच्या</u>** कालावधीकरीता भरावयाची असुन इच्छुक उमेदवारांनी खालील पदाकरीता दि. 21/02/2019 ते 22/02/2019 पर्यंत सळाळी. 1100 ते सांयकाळी 05.00 वाजेपर्यंत, ग्राउन्ड फ्लोअर, नवीन प्रशासकीय इमारत सिव्हील लाईन्स, नागपूर येथे नोंदणी करावी. विहीत वेळेनंतर येणा—या उमदेवारांच्या नावाची नोंदणी करण्यात येणार नाही.

| अ. क्र. | पदाचे नांव | एकुण पदे | अनुज्ञेय मासिक परिश्रम | वयो— मर्यादा | पदाचा संवर्ग | शैक्षणिक पात्रता व अनुभव. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | स्थापत्य अभियंता (पदवीधारक) | 12 | रू. 30000/— | मागासवर्गीय 43 वर्षे मुक्त संवर्गातील 38 वर्षे | अजा—2, अज—1, विजा(अ)—1 इमाव — 2 एसईबीसी—2 ईडब्ल्युसी—1 मुक्त — 3 | मान्यताप्राप्त तंत्र निकेतनची सिव्हील इंजिनिअरींग मधील संबधीत जागानुरुप डिग्री (पदवी) किंवा शासनाव्दारे मान्यताप्राप्त तत्सम पात्रता |
| 2 | स्थापत्य अभियंता (पदवीका धारक) | 12 | रू. 20000/— | मागासवर्गीय 43 वर्षे मुक्त संवर्गातील 38 वर्षे | अजा—2, अज—1, विजा(अ)—1 इमाव — 2 एसईबीसी—2 ईडब्ल्युसी—1 मुक्त — 3 | मान्यताप्राप्त तंत्र निकेतनची सिव्हील इंजिनिअरींग मधील संबधीत जागानुरुप डिप्लोमा (पदवीका) किंवा शासनाव्दारे मान्यताप्राप्त तत्सम पात्रता |
| 3 | स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक (आय.टी.आय. धारक) | 60 | रू. 15000/— | मागासवर्गीय 43 वर्षे मुक्त संवर्गातील 38 वर्षे | अजा—08, अज—04, विजा(अ)—02 भज(ब)—02 भज(क)—02 भज(ड)—01 विमाप्र — 01 इमाव — 11 एसईबीसी—10 ईडब्ल्युसी—6 मुक्त —13 | मॅट्रीक पास व आय.टी.आय. कोर्स पास ( सिव्हील इंजिनिअरींग बिल्डींग कन्सट्रक्शन ट्रेड मधील 2 वर्षाची परीक्षा पास झाल्याचे प्रमाणपत्र व अर्हता धारण केल्यानंतर किमान 2 वर्षाचा स्थापत्य विषयक कामाचा प्रत्यक्ष अनुभव |

- नोंदणी करीता येतांना उमेदवारांनी आपल्या शैक्षणिक पात्रता, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र/जन्म प्रमाणपत्र, मुक्त संवर्ग व्यतिरीक्त असल्यास जात व वैधता प्रमाणपत्र तसेच अनुभव प्रमाणपत्राची एक छायांकित प्रत (मुळ प्रमाणपत्रासह) सोबत आणावी. तसेच शासन निर्णय दि. 12/02/2019 नुसार खुल्या प्रवर्गातील आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांसाठी उत्पनाचा दाखल आवश्यक राहील.
- समांतर आरक्षणाबाबत सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्रमांक एस.आर.व्ही.—1012/प्र.क्र.16/12/16—अ दि. 13/08/2014 अन्वये आणि तद्नंतर शासनाने त्या संदर्भात वेळावेळी निर्गमीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

## अ) अर्हता :–

1) अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी पाहिजे.

2) सदर पदांची नेमणूक ही पूर्णतः कंत्राटी पध्दतीने असेल.

3) या पदावरील अधिकारी/कर्मचारी यांना शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.

4) उमेदवारांची निवड ही जातीच्या आधारे करण्योत येणार असल्यामुळे निवड झाल्यावर उमेदवारांनी 3 महिन्यांच्या आंत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांची कंत्राटी पध्दतीवरील नियुक्ती रद्द करण्यात येईल.

5) इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज महापालिका आयुक्त, नागपूर महानगरपालिका, सिव्हिल लाईन्स, नागपूर यांचेकडे नागपूर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर दिलेल्या प्रपत्रात भरून थेट सादर करावेत. इतर प्रपत्रात सादर केलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

6) वरील प्रवर्गनिहाय पदसंख्या व आरक्षण यामध्ये काही कारणाने बदल झाल्यास या बाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांना राहतील.

7) शासन निर्णय दि. 09 फेब्रुवारी 2018 मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने करार/कंत्राटी पध्दती निर्माण केलेल्या पदांवर नेमणूकीच्या अटी शर्तीबाबत तसेच सदर नियुक्त कर्मचा–यांच्या सेवा नियमित न करण्याबाबत नमूद असल्याने ही सर्व पदे निव्वळ कंत्राटी स्वरूपाची असून पुढे नियमित करण्यात येणार नाहित.

8) वयोमर्यादा विचारात घेतांना दि. 20/02/2019 ही तारीख ग्राहय धरण्यात येईल.

9) उमेदवारांनी त्यांच्या वय, शैक्षणिक पात्रता व अनुभवाच्या सर्व कागदपत्रांच्या छायाप्रती सांक्षाकिंत करून जोडाव्या.

10) उमेदवारांनी अर्ज सादर करून अर्जासोबत एक फोटो चिकटवावा व एक फोटो संलग्न करावा.

11) नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विविक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात येईल. तसेच सदर बंधपत्रात/हमीपत्रात करार पध्दतीने नियुक्ती देतांना शासनाने विहीत केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरीक्त अटी व शर्ती मान्य असल्याचे बंधपत्र /हमीपत्र उमेदवाराला दयावे लागेल.

12) करार पध्दतीवरील उमेदवारांना नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करता येणार नाही,

13) अनु. जाती/अनु. जमाती/विजाभज/विमाप्र/इमाव/एसईबीसीशी संबधीत असल्यास निर्धारीत प्राधिका–यांची जात प्रमाणपत्रे/वैधता प्रमाणपत्रासहित जोडावीत.

14) उमेदवारांनी नोंदणी करतांना संबंधीत पदाकरीता अपात्र आढळल्यास उमेदवारांची नोंदणी करण्यात येणार नाही. तसेच त्यांना अर्ज शुल्क परत मिळणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

15) मुलाखतीची तारीख तसेच इतर आवश्यक सुचना नागपूर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर www.nmcnagpur.gov.in वर प्रसिध्द करण्यात येईल. उमेदवारांनी याची नोंद घ्यावी

16) उमेदवारांनी निवड प्रक्रिये दरम्यान नागपूर महानगरपालिकेच्या संकेतस्थळ www.nmcnagpur.gov.in वरील सुचनांची नोंद घ्यावी. तसेच इतर कोणत्याही मार्गाने सूचना देण्यात येणार नाही. याची उमेदारांनी नोंद घ्यावी.

17) निव्वळ कंत्राटी स्वरूपाची पदे असल्याने समांतर आरक्षणामध्ये उमदेवार उपलब्ध न झाल्यास आरक्षित संवर्गातुन पदे भरण्यात येईल.

## ब) शुल्क :–

1. खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी रक्कम रू. 300/–
2. मागास/इतर प्रवर्गातील उमेदवारांसाठी रक्कम रू. 150/–

टिप :– प्रत्येक पदाकरीता वेगळयाने परिक्षा शुल्क भरावे लागेल. परिक्ष शुल्क अर्जाची नोंदणी करतांना स्विकारण्यात येईल.

## क) निवड प्रक्रिया :–

1. उपरोक्त पदाकरीता प्रत्यक्ष मुलाखत घेण्यात येणार आहे. तत्पूर्वी अंतीम वर्षाची गुणपत्रीकेमध्ये एकुण प्राप्त गुणाच्या टक्केवारीनुसार गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. CGPA मार्कीग स्कीम असल्यास उमेदवाराने त्याचे रूपांतर एकुण प्राप्त गुणांच्या टक्केवारीनुसार (100 टक्के) नुसार सादर करावे.
2. प्राप्त गुणाच्या टक्केवारीनुसार गुणवत्ता यादीतील उमेदवारांना शासन निर्णय दि. 13 जुन 2018 नुसार मुलाखतीकरीता बोलविण्यात येईल. व अशी यादी नागपूर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर www.nmcnagpur.gov.in वर दि. 25/02/2019 ला प्रसिध्द करण्यात येईल, वेगळयाने मुलाखतीसाठी पात्र उमेदवाराला मुलाखत पत्र देण्यात येणार नाही.
3. **पात्र उमेदवरांची प्रत्यक्ष मुलाखत दि. 27/02/2019 व 28/02/2019 रोजी सकाळी 11.00 वा. नविन प्रशासकीय इमारत यांचे कार्यालयात घेण्यात येईल. गुणवत्ता यादीतील उमेदवारांनी सकाळी 10.00 वा. उपरोक्त दिवशी मुळ शैक्षणिक पात्रतेसह व इतर आवश्यक कागदपत्रासह उपस्थित रहावे.**
4. मुलाखतीअंती प्राप्त गुणानुसार संवर्गनिहाय अंतीम गुणवत्ता यादी व प्रतिक्षा यादी म.न. पा. चे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येवुन त्यानुसार आदेश निर्गमीत करण्यात येईल.

**हस्ता/– अभिजित बांगर**
**आयुक्त**
**महानगरपालिका, नागपूर**

नागपूर
दि. /02/2019

| TOKEN No. | Appl. Category | % |
|---|---|---|
| | | |

(For office use only)

PHOTO

# NAGPUR MUNICIPAL CORPORATION, NAGPUR
# APPLICATION FORM FOR CONTRACT BASIS

**Name of post applied** : ..........................................................................................

**Name of the Candidates** : ..........................................................................................

**Addresss** : ..........................................................................................

**Mobile No** : ..........................................................................................

**Email Id** : ..........................................................................................

**Date of Birth** : ..........................................................................................

**Age as on 20/02/2019** : ..........................................................................................

**Caste** : ..........................................................................................

**Category (SC/ST/NT/SBC/OBC/SEBC/EWC/OPEN)** : ..........................................................................

**Category of application (SC/ST/NT/SBC/OBC/SEBC/EWC/OPEN) :** ........................................................

**Education Qualification :** (In case of CGPA grading Final Years converted marks are to entered with its total marsk & percentage.

| Sr. No. | Qualification In Civil Engineering | Year Of Passing | Obtained Marks in Final Years | Total Marks in Final Years | Percentage (Column No. 4 / 5 x 100) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | I.T.I | | | | |
| 2 | DIPLOMA | | | | |
| 3 | DEGREE | | | | |
| 4 | POST GRADUATE | | | | |

**Post Qualification Experience :**

| Sr. No. | Name of Organisation | Post Held | Period | | Total Period in Completed Years |
|---|---|---|---|---|---|
| | | | From | To | |
| 1 | | | | | |
| 2 | | | | | |
| 3 | | | | | |

(Candidate Signature)

(Verified by & Signature)